# नियमित दिवाणी दावा क्र. ६१/२०२१ मधील नि. ५ वरील आदेश
# ( कमल मधुकर येसुमाळी वि. शंकर बाळू नांदणीकर वगैरे १९)

१. सदरचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे कलम ३९ नियम १, २ व १५१ अन्वये तुर्तातूर्त ताकीद मिळण्याकरीता केला आहे. वादी व प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले तसेच त्यांच्या वकीलांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

२. वादीचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे –

वादीच्या म्हणण्यानुसार वर नमूद दावामिळकती या वादी व प्रतिवादी क्र.१, २ व प्रतिवादी क्र. ६ यांचे वडील मयत बाळू गिण्यानी नांदणीकर यांच्या होत्या. बाळू नांदणीकर यांच्या मृत्यूनंतर दावामिळकती वादी व प्रतिवादी क्र.१, २ व प्रतिवादी क्र. ६ यांना वारसाने प्राप्त झाल्या असून प्रतिवादी क्र.१ व २ यांची कब्जेदार म्हणून व वादी व प्रतिवादी क्र. ६ यांची बिनकब्जेदार वारस म्हणून नोंद झाली आहे. सोनाबाई व रुक्मिणी या ही मयत बाळू नांदणीकर यांच्या मुली असून त्यांनी त्यांचा हक्क सोडून दिला आहे. दावामिळकतींचे अद्याप सरस निरस मानाने वाटप झालेले नसून वादी यांचा दावामिळकतीत १/४ हिस्सा आहे. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दावामिळकत १ ड ही बिनशेती करुन घेतली असून त्यातील प्लॉट क्र. २ पैकी निम्मी मिळकत प्रतिवादी क्र. ३ यांना दि.०३/०६/२०१४ रोजी बक्षिसपत्राने करुन दिले आहे. दि.१८/०३/१९९८ रोजी प्रतिवादी क्र. १ यांनी ०.०१ हे. आर ची मिळकत प्रतिवादी क्र. ५ डोंगरे यांना खरेदीपत्राने करुन दिली होती व तिच मिळकत पुन्हा प्रतिवादी क्र. १ यांनी प्रतिवादी क्र. ५ यांच्याकडून खरेदी केली. प्रतिवादी क्र.२ यांनी १ ड मधील मिळकतीपैकी प्लॉट क्र.२ पैकी १०० चौ.मी. ची मिळकत प्रतिवादी क्र. ५ डोंगरे यांना खरेदीपत्राने दिली व तिच मिळकत प्रतिवादी क्र. ५ ने प्रतिवादी क्र. ४ संदीप डोंगरे यांना खरेदी दिली. सदरचा व्यवहार हा प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी संगनमताने केला असून झालेला व्यवहार वादीवर बंधनकारक नाही. प्रतिवादी क्र.१ ते ५ दावा मिळकती विल्हे विक्री करण्याचा व त्यावर बोजा निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. दि.२८/१२/२०२० रोजी वादीने प्रतिवादी क्र.१ ते ४ व प्रतिवादी क्र. ६ यांना दावा मिळकत वाटप करुन मिळणेकरिता त्यांच्या विधीज्ञामार्फत नोटीस पाठविली असता दि. १८/०१/२०२१ रोजी प्रतिवादी क्र. १ व २ यांनी वादीस उत्तरी नोटीस दिली. दावामिळकतींमध्ये प्रतिवादी क्र. १ ते ६ यांनी तबदीली करु नये म्हणून वादीने दि. ३१/१२/२०२० रोजी दैनिक "तरुण भारत" या वर्तमानपत्रामध्ये जाहीर नोटीस

दिली असूनही प्रतिवादी क्र. १ ते ६ हे दावामिळकती तबदीली करण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे वादीचे पैशाने कधीही न भरून येणारे नुकसान होत आहे. म्हणून वादीने प्रतिवादीं विरुध्द सरस निरस मानाने वाटपासाठी, डिक्लेरेशनसाठी व निरंतरच्या ताकीदीकरता दावा व तूर्तातूर्त ताकीदीकरता नि. ५ कडे अर्ज केलेला आहे. सदर दावेचा गुणावगुणावर निर्णय होण्यास बराच कालावधी लागणार आहे. त्यामुळे दाव्याचा अंतिम निकाल होईपावेतो प्रतिवादी क्र.१ ते ५ यांना तूर्तातूर्त ताकीद देण्यात यावी अशी विनंती वादी हिने केली आहे.

३. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनीही त्यांचे लेखी म्हणणे नि. ४६ कडे दाखल करुन वादीचा अर्ज नाकारलेला आहे. त्यांच्या कथनानुसार दावा मिळकतीचे वर्णन हे सर्वसाधारणपणे बरोबर आहे परंतु त्यांच्या चतुःसिमा नमुद केलेल्या नाहीत. दावा मिळकत कलम १ अ मध्ये नेमक्या कोणत्या बाजूचा आठ आणे हिस्सा हा बाळू नांदणीकर यांचा होता, दावा कलम १ क व १ ड मध्ये नमुद केलेल्या मिळकतीमध्ये बाळू नांदणीकर यांची किती क्षेत्राची मालकी होती तसेच सर्वे नं. २२८/१ मध्ये बाळू नांदणीकर यांचे वारसाचा नेमका समाईकात किती हिस्सा आहे याबाबत स्पष्टपणे कथन केले गेलेले नाही. सन १९७२ साली अर्ज कलम १ ड यात नमूद केलेली मिळकत अस्तित्वात नव्हती. अर्ज कलम १ अ ते १ क या मिळकतीच्या ७/१२ पत्रकी १९७२ मध्ये बाळू गिन्यानी नांदणीकर यांच्या चारही मुली व त्यांची पत्नी यांची बिगरकब्जेदार वारस म्हणून नोंद झालेली होती व त्यावेळी या सर्वांनी तीनही मिळकतीमधील त्यांचा हक्क व हिस्सा लेखी अर्जाद्वारे सोडून दिलेला आहे. बिगरकब्जेदार वारस म्हणून असलेली इतर हक्कातील नोंदही केवळ नॉमिनल व पोकळ स्वरुपाची होती. चारही मुलींना दावा मिळकतीमध्ये हक्क प्राप्त करणेची इच्छा असती तर त्यांनी रेव्हन्यू अधिका–यांकडे तसे अर्ज केले असते. म्हणजेच याउलट बाळूच्या मुलींनी त्यांचा हक्क भावांच्या नावे सोडून दिलेला होता. वादी वगळता इतर तीनही बहिणींनी आजपावेतो वाटपाचा दावा केलेला नव्हता व नाही. वादीला दावा करणेचा कायदेशीर अधिकार नाही. सन १९७२ साली वादीने स्वतःच्या कृतीने व उक्तीने तोंडी वाटपाने आपला हक्क सोडून दिलेला असल्यामुळेच तिने आजतागायत वाटपाचा दावा आणलेला नव्हता. सन १९७२ पासून सन २०१४ पर्यंत दावा मिळकतीच्या वाटपाबाबत वादीने तोंडी व लेखी स्वरुपात मागणी केलेली नव्हती. वादीने हक्कसोडपत्र देणेबाबत जरी टाळाटाळ केली असली तरी सन २०१४ मध्ये झालेल्या तोंडी वाटपाद्वारे आपला हक्क सोडून दिलेला होता. सदरचे तोंडी वाटप वादीवर व द्रौपदी बरगाले यांचेवर आजही बंधनकारक आहे. जून २०१४ मध्ये प्रतिवादी क्र. १ यांनी प्रतिवादी क्र. ३ चे नावे

दावा कलम १ क मध्ये नमूद असलेल्या मिळकतीपैकी निम्मे क्षेत्र म्हणजेच २००० चौ. फूटाची जागा नोंद बक्षीसपत्राने वर्ग केली. याबाबतची सर्व माहिती वादींना होती व आहे. कारण सदर मिळकतीवर प्रतिवादी क्र. ३ यांनी बांधकाम परवाना मिळवून बांधकाम केले आहे व सदर बांधकामाच्या वास्तुशांती कार्यक्रमावेळी वादी हजर होते. घराच्या बांधकामाकरिता प्रतिवादी क्र. ३ याने बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा मिरज यांचेकडून कर्ज काढले होते व त्या कर्जाच्या कारणसंदर्भामध्ये वादी अगर वादीच्या बहिणींनी आजपर्यंत तक्रार केलेली नव्हती व नाही. प्रतिवादी क्र. ३ यांनी बांधकामाकरिता कर्ज घेण्याअगोदर ॲड. माधव ताम्हणकर यांचे मार्फत दि. १/१०/२०१४ रोजी दैनिक "तरुण भारत" मध्ये नोटीस प्रसिध्द करुन आक्षेप मागविले होते. परंतु त्या नोटीसीस वादींनी कसलाही आक्षेप नोंदविलेला नव्हता. दावा मिळकतीवर सन १९७२ पासून सन २०२० पर्यंत प्रतिवादी क्र. १ व २ यांनी वेगवेगळ्या सहकारी संस्था व बँकाकडून शेतीकरिता कर्जे काढलेली आहेत व त्याच्या नोंदीही ७/१२ पत्रकी वेळोवेळी झालेल्या आहेत. परंतु, सदर व्यवहाराबाबत वादींनी तक्रार केलेली नव्हती व नाही.

४. अशाप्रकारे वादी हिचा वाद मिळकतीशी सन १९७२ व सन २०१४ मध्ये झालेल्या तोंडी वाटपामुळे कोणताही संबंध राहिलेला नाही. या कारणास्तव वादीची दि. २८/१२/२०२० रोजीची वकीलांमार्फत पाठविलेली नोटीस कायदेशीर ठरु शकत नाही. वादी हिला दावा मिळकतीबाबतच्या प्रत्येक व्यवहाराची माहिती व्यवहाराच्या दिवसापासून असल्यामुळे वादीस प्रथमदर्शनी केस नाही. बॅलन्स ऑफ कनव्हीनियन्सही वादीच्या वतीने नाही. तुर्तातूर्त ताकीद अर्ज नामंजूर केलेस वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. वादी हिने तुर्तातूर्त अर्जाद्वारे दावा मिळकतीवर कर्ज बोजे निर्माण करु नयेत अशी ताकीद मागितलेली आहे. मे. कोर्टाने त्या अनुषंगाने काही आदेश पारीत केल्यास प्रतिवादी क्र. १ व २ यांना सोसायटी किंवा अन्य बँकेकडून शेतीसाठी कर्ज काढणे अशक्य होणार आहे. प्रतिवादी क्र. १ व २ यांना शेतीशिवाय अन्य कोणतेही उत्पन्न नाही. त्यामुळे शेती व्यवसायाकरिता लागणारे कर्ज वगळून इतर कर्जाचे बोजे प्रतिवादींनी निर्माण करु नयेत अशा स्वरुपाचा हुकूम करणे योग्य ठरणार आहे.

५. प्रतिवादी क्र. ५ यांनी त्यांचे म्हणणे नि. ५१ वर दाखल करुन व प्रतिवादी क्र. ४ यांनी प्रतिवादी क्र. ५ चे म्हणणे नि. ७६ चे पुरसीसने मान्य करुन वादीचा अर्ज नाकारलेला आहे. प्रतिवादी क्र. ५ यांनी दावा मिळकतीचे वर्णन मान्य केले आहे. परंतु त्यांच्या कथनानुसार

सोनाबाई व रुक्मीणी यांचा हिस्सा वादी तसेच प्रतिवादी क्र. १, २ व ६ यांना प्राप्त होतो हे विधान अमान्य केलेले आहे. दावा मिळकती सामाईक असल्याचे व त्यामध्ये वादीचा १/४ हिस्सा असल्याचेही प्रतिवादींनी अमान्य केलेले आहे. प्रतिवादींच्या कथनानुसार दि. १८/०३/१९९८ रोजी सर्वे नं. २२८/१ मधील ०.१ आर क्षेत्राच्या मिळकतीबाबत प्रतिवादी क्र. ५ यांचे नावे झालेले खरेदीपत्र व त्याच्या व्यवहाराची सर्व माहिती वादीला होती व आहे. तसेच दावा कलम १ ड मधील मिळकतीबाबत दि. १७/१२/२०१४ रोजी झालेल्या खरेदीपत्राची व त्या मिळकतीमध्ये झालेल्या बांधकामाची माहिती वादीला होती व आहे. सदरचे व्यवहार प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी संगनमताने केले नसल्यामुळे ते वादीवरही बंधनकारक आहेत. त्यामुळे वादीला आता तक्रार करणेचा अधिकार नाही. प्रतिवादी क्र. ४ हे मिलिट्री खात्यात नोकरीस असून ते मिरजेत राहत नाहीत. त्यामुळे त्यांच्या विरुध्द प्रस्तुतचा अर्ज चालणेस पात्र नाही. या सर्व कारणांमुळे वादीचा अर्ज नामंजूर करावा असे कथन केले आहे.

६. वरील सर्व बाबींचा विचार करता खालील वादप्रश्न माझे निर्णयाकरीता उपस्थित झाले असून त्यावरील माझे निर्णय मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ. क्र.** | **वादप्रश्न** | **निर्णय** |
|---|---|---|
| १. | दावा प्रथमदर्शनी वादीच्या बाजूने आहे काय? | होकारार्थी. |
| २. | सदरचा अर्ज नामंजूर केल्याने वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे काय? | होकारार्थी. |
| ३. | न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे काय? | अंशतः होकारार्थी. |
| ४. | आदेश का? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## <u>कारणमिमांसा</u>

### <u>मुददा क्र. १ बाबत</u>

७. वादी ही प्रतिवादी क्र. १, २ व ६ यांची सख्खी बहीण आहे ही बाब प्रतिवादींनी कोठेही नाकारलेली नाही. लग्नापूर्वीचे वादीचे नाव कु. शांता बाळू नांदणीकर असे होते हे नि. ३/१०

कडे शाळा सोडलेच्या दाखल्यावरुन दिसून येते व लग्नानंतर तिचे नाव कमल मधुकर येसुमाळी झाले असलेबाबतचे आधारकार्ड नि. ३/२७ कडे हजर आहे. यावरुन वादी व प्रतिवादी क्र. १ ते ३ व ६ यांच्यात असलेल्या नातेसंबंधाबाबत वाद असल्याचे दिसत नाही.

दावा मिळकती या वादी व प्रतिवादी क्र. १, २ व ६ यांचे वडील बाळू गिन्यानी नांदणीकर यांच्या वडीलार्जित मालकी वहिवाटीच्या होत्या हे सकृतदर्शनी दाखविण्याकरिता वादी यांनी नि. ९ कडे गट नं. २२७/२ चा ७/१२ उतारा, नि. १० कडे गट नं. २४०/१/२/२/३/२/२ अ चा ७/१२ उतारा, नि. ११ कडे गट नं २२८/१ चा ७/१२ उतारा, नि. १२ कडे गट नं. २२८/१/२ चा ७/१२ उतारा, नि. ३/७ कडे फेरफार नं. ९६७० चा उतारा, नि. ३/८ कडे फेरफार नं. ४९१५३ चा उतारा, नि. ३/९ कडे फेरफार नं. ५१०६१ चा उतारा इ. कागद हजर केलेले आहेत. याशिवाय नि. ३/१४ कडे दि. ०७/०१/२०१५ रोजीच्या हक्कसोडपत्राची झेरॉक्स प्रत हजर केलेली आहे.

या सर्व कागदपत्रांवरुन सदयस्थितीत वादी व प्रतिवादी क्र. १ ते ३ व ६ चे पुर्वहक्कदार बाळू गिन्यानी नांदणीकर यांचे नावे दावा अर्ज कलम १ अ ते १ ड यात वर्णन केलेल्या मिळकती नमूद होत्या असे दिसून येते. नि. ३/१४ कडे हजर असलेल्या हक्कसोडपत्रातील पान क्र. ३ वर दिलेले मिळकतीचे वर्णन व वादीने दिलेले दावा मिळकतीचे वर्णन एकच असलेचे व या मिळकती वडीलार्जित मिळकती असल्याचे नमूद केले असल्याचे दिसते. प्रतिवादी यांनी दावा मिळकती या बाळू गिन्यानी नांदणीकर यांच्या स्वकष्टार्जित मालकी वहिवाटीची असल्याची केस कथित केली आहे व त्या अनुषंगाने नि. ५१/१ ते ३ कडे दावा मिळकतीबाबतची सन १९४७ व सन १९६२ मधील तीन खरेदीपत्रे हजर केलेली आहेत. **परंतु** या तीनही खरेदीपत्रानंतर झालेले नि. ३/१४ कडील हक्कसोडपत्र हे दि. ०७/०१/२०१५ रोजीचे असून त्यामध्ये दावा मिळकत ही वडीलार्जित मिळकत असलेबाबतचा उल्लेख नमूद केलेला आहे.

दावा मिळकतीबाबत सरसनिरस मानाने वाटप झाले असलेबाबतचे रजिस्टर्ड वाटपपत्र अथवा दिवाणी कोर्टाचा हुकूमनामा अभिलेखावर नाही. तसेच दि. ०७/०१/२०१५ रोजीच्या नि. ३/१४ कडे हजर असलेल्या हक्कसोडपत्रामध्येही दावा मिळकती या सामाईक वहिवाटीच्या असल्याचे नमूद करणेत आलेले आहे. वादातील बक्षीसपत्र नि. ३/१३ कडे हजर असून ते ही हक्कसोडपत्राच्या आधीचे म्हणजेच दि. ०२/०६/२०१४ रोजीचे आहेत. तसेच नि. ३/१२ कडे हजर असलेले खरेदीपत्र ही दि. १७/१२/२०१४ रोजीचे आहे. दावा मिळकतीबाबत झालेला शेवटचा नोंदणीकृत कागद हा दि. ०७/०१/२०१५ रोजीचा

हक्कसोडपत्राचा कागद असून त्यामध्ये खुदद प्रतिवादींनीच दावा मिळकती या सामाईक वहिवाटीच्या व वडीलार्जित मालकीच्या असे नमूद केले असल्याने दावा मिळकती या वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान सामाईकात आहेत असेच दिसून येते.

प्रतिवादी तर्फे विद्वान वकीलांनी युक्तीवादादरम्यान वादी ही प्रतिवादी क्र. १, २ व ६ यांची बहीण असल्याचे सांगितले. तसेच प्रतिवादी क्र. ५ हा प्रतिवादी क्र. ६ हिचा नात्याने पती व प्रतिवादी क्र. ४ हा मुलगा असल्याचेही सांगितले. याशिवाय वादी व प्रतिवादी क्र. ४ ते ६ हे एकाच गावी काही अंतरावर राहतात असे सांगून वादी हिला प्रतिवादी क्र. १ ते ६ यांचेबरोबर झालेल्या व्यवहाराची संपूर्ण माहिती होती व त्यामुळे तिचा तुर्तातूर्त मनाई अर्ज नामंजूर करावा असा युक्तीवाद केला. परंतु, नि. ३/१२ कडे असलेल्या खरेदीपत्रावर नि. ३/१३ कडे असलेल्या बक्षीसपत्रावर वादीची संमती दिसून येत नाही. यावरुन तिला सदर व्यवहाराची कायदेशीर माहिती नव्हती असेच दिसते. त्यामुळे प्रतिवादी तर्फे विद्वान वकीलांनी केलेला युक्तीवाद योग्य वाटत नाही.

प्रतिवादी क्र. ३ याने दावा मिळकतीवर कर्ज काढून घर बांधले असलेबाबतची कागदपत्रे प्रतिवादींनी नि. ५१/४ ते नि. ५१/७ कडे हजर केलेली आहेत. सदरच्या घराचे वास्तुशांतीचे फोटो व पत्रिका प्रतिवादींनी नि. ५१/८ ते ११ कडे हजर केलेली आहे. त्यामध्ये वादी कार्यक्रमास उपस्थित होती असे दाखवून वादीला प्रतिवादी क्र. ३ याच्या दावामिळकतीमधील बांधकामाबाबतची, त्याबाबतीतल्या कर्ज प्रकरणाची व बक्षीसपत्राबाबतची संपूर्ण माहिती होती असा युक्तीवाद ही प्रतिवादी तर्फे विद्वान वकीलांनी केला. परंतु सदयस्थितीत या सर्व कागदपत्रांवरुन केवळ दावा मिळकतीवर नवीन घराचे बांधकाम झाले आहे व त्याची माहिती वादी हिला होती असेच दिसते. ते बांधकाम खुदद प्रतिवादी क्र. ३ यांनी बक्षीसपत्राआधारे केले आहे व त्या बांधकामाच्या कर्जाबाबतची कागदपत्रे प्रतिवादी क्र. ३ चे नावे आहेत याची माहिती वादीला होती असे म्हणता येणार नाही व या कारणावरुन वादी ही उशिरा न्यायालयाकडे अंतरीम मनाईची ऐच्छीक दाद मागत आहे असेही म्हणता येणार नाही. वादी व प्रतिवादी यांच्यातील नातेसंबंध पाहता सदयस्थितीत प्रतिवादी क्र. ३ यांनी तोंडी वाटपाने आलेल्या मिळकतीत बांधकाम केले आहे व त्या बांधकामाबाबत वादीस पूर्ण कल्पना होती असे दिसत नाही. त्यामुळे प्रतिवादी तर्फे विद्वान वकीलांनी Delay & Laches बाबत केलेला युक्तीवादही या ठिकाणी न पटण्यासारखा आहे.

प्रतिवादी क्र. ४, ५ व १५ तर्फे विद्वान वकीलांनी युक्तीवाद केला की, वादी व प्रतिवादी हे एकाच गावात काही अंतरावर राहतात. प्रतिवादी क्र. ५ हे सन १९९८ पासून

आजतागायत दावामिळकतीमध्ये राहतात याची माहिती व त्यासंदर्भात झालेल्या खरेदीपत्राची माहिती वादी हिला बहीण म्हणून आहे. त्यामुळे वादीच्या अर्जास जवळपास २० वर्षाचा प्रदीर्घ विलंब झालेला असल्याने वादीचा अंतरीम अर्ज चालणेस पात्र नाही. परंतु नि. ९/१ कडे व नि. ३/११ कडे असलेल्या दोनही खरेदीपत्रांवर वादीची संमती दिसून येत नाही. त्यामुळे तिला या व्यवहारांची कायदेशीर माहिती होती असे या स्थितीत म्हणता येणार नाही. तसेच प्रतिवादी क्र. १५ हिच्या लाभात झालेले सन १९९८ मधील खरेदीपत्र हे जगताप वगैरे लोकांनी लिहून दिलेले आहे असे खुदद प्रतिवादींचेच कथन आहे. त्यामुळे त्या व्यवहाराची माहिती वादीला असायला पाहिजे असे नाही.

वादीने केवळ दावा मिळकतीमधील तिच्या १/४ हिश्श्याचे किंवा कोर्टामार्फत येणा–या हिश्श्याचे दाव्याचे अंतिम निकालापावेतो हस्तांतरण होऊ नये अशी अंतरीम मनाईची दाद मागितलेली आहे. उपलब्ध कागदपत्रांवरुन वादी व प्रतिवादी यांनी केलेल्या लेखी कथनांवरुन तसेच वादी व प्रतिवादी तर्फे विद्वान वकीलांनी केलेल्या युक्तीवादावरुन, याशिवाय नि. ३/१४ कडे असलेल्या दि. ०७/०१/२०१५ रोजीच्या नोंदणीकृत हक्कसोडपत्रामधील मजकुरावरुन सदयस्थितीत दावा मिळकत ही वादी, प्रतिवादी क्र. १, २ व ६ यांची सामाईक वहिवाटीची वडीलार्जित मिळकत असल्याचे स्पष्ट होते व बाळू गिन्यानी नांदणीकर हिची वारस म्हणून वादी हिचा त्यामध्ये अविभक्त सामाईक हक्क व हिस्सा आहे हे ही दिसून येते. त्यामुळे वादीस दावा मिळकतीबाबत सकृतदर्शनी केस आहे असे मत नोंदवून मुददा क्र. १ चे उत्तर हे न्यायालय होकारार्थी नोंदविते.

## <u>मुद्दा क्र. २ बाबत</u>

८. वादीने दावा मिळकतीमध्ये तिचा अविभक्त कायदेशीर हिस्सा आहे हे प्रथमदर्शनी दाखवून दिलेले आहे. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दावा मिळकतीवर वादीच्या परवानगीशिवाय कर्जे घेतलेली आहेत व ते यापुढेही शेती कारणाकरिता कर्ज घेणार आहेत असे त्यांच्या लेखी म्हणण्यामध्ये नमूद केलेले आहे. प्रतिवादी क्र. ३,४ व ५ यांनीही तोंडी वाटपाची केस कथित करुन वादीचा अविभक्त हिस्सा नाकारुन तिच्या कायदेशीर हक्कास हरकत उपस्थित केलेली आहे. या स्थितीत वादीचा अर्ज नामंजूर झालेस प्रतिवादी हे पुन्हा दावा मिळकतीबाबत कर्ज काढून वादीच्या सकृतदर्शनी समोर आलेल्या कायदेशीर अविभक्त हिश्श्याचे अपरिमित नुकसान करतील हे असे दिसत असल्यामुळे मुददा क्र. २ चे उत्तरही हे न्यायालय होकारार्थी देते.

## मुद्दा क्र. ३ बाबत

९. दावा मिळकतीत वादीबरोबर प्रतिवादी क्र. १,२ व ६ यांचेही अविभक्त हिस्से आहेत हे स्पष्ट झाले असल्याने व प्रतिवादी क्र. ३ ते ५ हे सदयस्थितीत दावामिळकतीच्या कब्जेत आहेत हे वादीलाही मान्य असल्यामुळे वादीचा अर्ज आहे त्या स्थितीत मंजूर केलेस प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या कायदेशीर हिश्श्यांवर व प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांच्या कायदेशीर वहिवाटीचे अंतरीम मनाईमुळे अपरिमित नुकसान होऊ शकते व अर्ज आहे त्या स्थितीत नामंजूर केल्यास वादी हिने सकृतदर्शनी दाखविलेल्या तिच्या अविभक्त १/४ हक्क–हिश्श्याचे अपरिमित नुकसान होईल. त्यामुळे या स्थितीत केवळ वादी हिच्या सकृतदर्शनी समोर आलेल्या १/४ हक्क–हिश्श्याची तबदिली करु नये अथवा बोजा निर्माण करु नये अशी अंशतः अंतरीम मनाई दिलेस प्रतिवादींचेही नुकसान होणार नाही. परंतु न दिलेस वादीचे अपरिमित नुकसान होऊ शकते. त्यामुळे या सर्व नुकसानींचा विचार केल्यास वादीच्या अविभक्त हिश्श्याचे होणारे नुकसान हे निश्चितच जास्त असल्यामुळे दाव्याचे समतोलत्व अंशतः वादी वतीने आहे असे नमूद करुन मुददा क्र. ३ चे उत्तर अंशतः होकारार्थी नमूद करुन मुददा क्र. ४ चे अनुषंगे हे न्यायालयखालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज अंशतः मंजूर करणेत येत आहे.

२. प्रतिवादी क्र. १ ते ५ अगर तर्फे इसम वा एजंट यांनी दाव्याचे अंतिम निकालापावेतो वादीच्या प्रथमदर्शनी समोर आलेल्या अविभक्त १/४ हिश्श्यावर कसलीही कर्जे काढू नयेत अथवा सदरचा अविभक्त हिस्सा कोणत्याही मार्गाने हस्तांतरीत करु नये म्हणून त्यांना अंतरीम तूर्तातूर्त मनाई ताकीद करणेत येते.

स्वाक्षरीत/–

मिरज.
(श्रीमती यु.पी. कोळी)

दि. १६/१०/२०२१
३रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, मिरज.

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Sou. A.C. Patil (Grade-III) |
| Court | : | III$^{rd}$ Jt.C.J.J.D. & J.M.F.C., Miraj. |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 20/10/2021 |
| Judgment/Order uploaded on | : | 20/10/2021 |